| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | **2025**<br><br>**CB/ 39/2025** |

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक १०.०७.२०२५**

**ऑनलाईन साईटद्वारे वेश्याव्यवसाय चालविणा-या टोळीचा पर्दाफाश करून ०५ पिडीत महिला/मुलींची सुटका व ०३ आरोपी अटक.**

---

श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, ( गुन्हे ), यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि /पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, मोबाईल क्रमांक ९८३३३९८५३३ हा गुगल वर टाकुन सर्च केले असता https://schloka.com , https://in.empirescort.com, https://kokqa.com या ऑनलाईन साईटवर गेल्यानंतर वरील नंबर ९८३३३९८५३३ हा व्हॉटसअप चॅटिंग मध्ये घेवुन जातो. त्या नंबरवर चॅटिंग केली असता, त्याद्वारे नवी मुंबई मधील नेरूळ, वाशी, तुर्भे परिसरात लॉज बुक करून किंवा गि-हाईकास लॉज मध्ये रूम बुक करावयास लावुन किंवा गि-हाईकाच्या सोई नुसार पाच तासासाठी ४०००/- रु वेश्यागमनाचा मोबदला घेवुन गि-हाईकास मुली पुरवतात अशी खात्रीशीर माहिती मिळाली होती.

नमुद मोबाईल क्रमांकावर दिनांक ०८/०७/२०२५ रोजी बनावट ग्राहकामार्फत चॅटिंग केले असता, मोबाईल नंबर ९८३३३९८५३३ धारक याने हॉटेल गोल्डन ओक, प्लॉट नंबर डीसी ०१, पाबलो पबच्या बाजुला, तुर्भे, नवी मुंबई या ठिकाणी रुम बुक करण्यास सांगुन महिलांचे फोटो व्हॉटअपवर पाठवुन एका महिलेचे ४०००/- रूपये याप्रमाणे पैसे दयावे लागतील असे सांगुन, बनावट ग्राहकास हॉटेल मधील रूमचा फोटो पाठविण्यास सांगितला. त्याप्रमाणे फोटो पाठवल्या नंतर ग्राहकांने निवडलेली महिला ऑनलाईन साईट चालवण्या-या इसमाने नमुद लॉजवर पाठविली असता दिनांक ०८/०७/२०२५ रोजी रात्रौ ११:०० वाजताच्या सुमारास बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरुन छापा टाकला.

त्यावेळी सदर ठिकाणी वेश्यागमनाकरीता मिळुन आलेल्या महिलेकडे चौकशी केली असता, तिला राजेशकुमार मुन्ना यादव (ऑनलाईन साईट चालविणारा) यांनी पाठविल्याचे निष्पन्न झाले. राजेशकुमार मुन्ना यादव हा ऑनलाईन बुकिंगसाठी वापरत असलेल्या मोबाईलचा तांत्रिक तपास करून त्याला जुहूगाव, वाशी येथुन ताब्यात घेण्यात आले. त्याचप्रमाणे लॉजवर मिळुन आलेल्या पिडीत मुलीकडे चौकशी केली असता, इतर महिला व मुली यांना म्हात्रे निवास, से.नं.२०, नेरूळ, नवी मुंबई येथे ठेवलेले असल्याचे सांगितले.

सदर ठिकाणी जावुन छापा टाकला असता, रूममध्ये दोन मुली मिळुन आल्या. शंभु मुनीलाल उपाध्याय (दलाल), बॉबी उर्फ मकबुल बिलाल अन्सारी (दलाल) यांच्या कंपनीतील असल्याचे सांगुन सदर घर त्यांना शंभु मुनीलाल उपाध्याय यांने भाडयाने घेवुन दिल्याचे मुलींनी सांगितले. तसेच सदर मुलींना वेगवेगळया लॉजवर सोडणारा मुकेश कुमार आकलु राय ( रिक्षाचालक ) व दिनेश शिवचरण डांगी (दलाल) यांना त्यांचे मोबाईल क्रमांकाच तांत्रिक तपास करून इतर दोन पिडीत मुली/ महिलासह ताब्यात घेण्यात आले आहे.

याबाबत तुर्भे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ४५९/२०२५ बीएनएस कलम १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ४,५ अन्वये दिनांक ०९/०७/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास तुर्भे पोलीस ठाणे करत आहे.

सदर गुन्हयात १) राजेशकुमार मुन्ना यादव (ऑनलाईन साईट चालविणारा ) २) दिनेश शिवचरण डांगी (दलाल) ३) मुकेश कुमार आकलु राय ( रिक्षाचालक ) यांना आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी १२:३३ अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक १४/०७/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.

तसेच पाहिजे आरोपीत नामे १) शंभु मुनीलाल उपाध्याय (दलाल) २) बॉबी उर्फ मकबुल बिलाल अन्सारी (दलाल) ३) धिरू यांचा शोध सुरू आहे.

सदरचे कारवाई मध्ये सहा. पोलीस आयुक्त,AHTU, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/अलका पाटील, पोउपनि/ सरिता गुडे, पोशि/ चव्हाण, पोशि/ठाकुर, पोशि/ कोलते, पोशि/ पारासुर, पोहवा/ अडकमोल, पोना/ भोये चालक पोहवा/४४४२ हांडे हे सहभागी होते.

★★★★★★★★★★★